महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

==========================================================================

जा.क्र.तंशिविकापू/विवि/२०२०-२१/ 370 दिनांक : 22 JAN 2021

**परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय संस्था,

विषय :-**राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्याचा कार्यक्रम साजरा करण्याबाबात**

संदर्भ : मा.मुख्य सचिव,सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील अ.शा.प.क्र संकीर्ण २०२०/प्र.क्र ७१०/२२ दिनांक १८ जानेवारी २०२१

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुसरुन या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था प्रमुख /कार्यालय प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात येणार आहे. त्या अनूषंगाने १८ वर्ष पूर्ण केलेल्या नवीन तरुण मतदारांचा मतदार यादीत समावेश करणे व त्यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढविणे हा प्रमुख उद्देश आहे. पत्रकात नमूद केल्याप्रमाणे शपथ घेण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयास सुचित केलेले आहे.

राष्ट्रीय मतदार दिवशी लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ सर्व मतदारांना दिली जाते. त्यानूसार शासकीय कार्यालयामध्ये सर्व अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी शपथ घेण्याचा कार्यक्रम **दिनांक २५ जानेवारी २०२१ रोजी सकाळी १०:३० वाजता आयोजित करण्यात यावा**. राष्ट्रीय मतदार दिवसांची इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेमध्ये घ्यावयाच्या शपथेचा नमुना या पत्रासोबत जोडलेला आहे.

शपथ घेतलेबाबतचा फोटोसह अहवाल या कार्यालयास सादर करावा जेणेकरुन सदर अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करणे शक्य होईल.

सोबत :- संदर्भिय पत्र

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महत्वाचे

अ.शा.प.क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.७१०/३३
**सामान्य प्रशासन विभाग**
हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- १८ जानेवारी, २०२१

महाराष्ट्र शासन

संजय कुमार
मुख्य सचिव

**विषय :- राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्याचा कार्यक्रम साजरा करण्याबाबत.**

संदर्भ :- सचिव, भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे अर्धशासकीय पत्र क्र. 491/ECI/ FUNC/LET/SVEEP-1/NVD/2020/ दिनांक-६/०१/२०२१.

प्रिय श्री./श्रीम.

उपरोक्त विषयाबाबत भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेकडून प्राप्त झालेल्या संदर्भाधीन पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजी "राष्ट्रीय मतदार दिवस" साजरा करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने १८ वर्षे पूर्ण केलेल्या नवीन तरूण मतदारांचा मतदार यादीत समावेश करणे व त्यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढविणे हा प्रमुख उद्देश आहे.

राष्ट्रीय मतदार दिवशी लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ सर्व मतदारांना दिली जाते. त्यानुसार आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालयामध्ये सर्व अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी शपथ घेण्याचा कार्यक्रम **दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजी** आयोजित करण्यात यावा. राष्ट्रीय मतदार दिवशी इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेमध्ये घ्यावयाच्या शपथेचा नमुना सोबत जोडण्यात आला आहे. "कोविड" बाबत सर्व शासकीय सुचनांचे/आदेशांचे काटेकोर पालन करण्यात यावे.

आपला स्नेहांकित,

( संजय कुमार )

**अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सर्व)**
**विभागीय आयुक्त (महसूल) (सर्व)**
**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)**

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
21 JAN 2021
आवक क्र. ८८९

दूरध्वनी : कार्यालय ०२२-२२०२ ५० ४२/२२०२ ८७ ६२, फॅक्स : २२०२ ८५ ९४, ई-मेल : cs@maharashtra.gov.in

# राष्ट्रीय मतदार दिवस
# मतदारांसाठी प्रतिज्ञा

## मराठी

"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू."

## हिंदी

"हम, भारत के नागरिक, लोकतंत्र मे. अपनी पूर्ण आस्था रखते हुए यह शपथ लेते हैं की हम अपने देश की लोकतांत्रिक परम्पराओंकी मर्यादा को बनाए रखेंगे तथा स्वतंत्र, निष्पक्ष एवं शांतिपूर्ण निर्वाचन की गरिमा को अक्षुण्ण रखते हुए, निर्भीक होकर, धर्म, वर्ग, जाति, समुदाय, भाषा अथवा अन्य किसी भी प्रलोभन से प्रभावित हुए बिना सभी निर्वाचनो में अपने मताधिकार का प्रयोग करेंगे."

## English

" We, the citizens of India, having abiding faith in democracy, hereby pledge to uphold the democratic traditions of our country and the dignity of free, fair and peaceful elections, and to vote in every election fearlessly and without being influenced by considerations of religion, race, caste, language or any inducement."

********************

# जिल्हाधिकारी कार्यालय (निवडणूक शाखा) पुणे

**बी विंग, चौथा मजला, पुणे -४११००१**

फोन / फॅक्स नं. ०२०-२६१२३७४४ E-mail - dydeopune१@gmail.com


क्र. पीईई-३/जा.क्र./८६/२०२१
दि. २०/०१/२०२१

**प्रति,**

**कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख,**

---------------------------

---------------------------

**विषय - राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्याचा कार्यक्रम साजरा करण्याबाबत.**

संदर्भ - मा. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील अ.शा.प.क्र. संकीर्ण२०२०/प्र.क्र.७१०/३३ दिनांक १८ जानेवारी २०२१.

उपरोक्त विषयाबाबत मा. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडुन प्राप्त झालेल्या संदर्भाधीन अर्धशासकीय पत्राची प्रत यासोबत जोडणेत आलेली आहे. त्याचे अवलोकन करणेत यावे.

दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने १८ वर्ष पूर्ण केलेल्या नवीन तरुण मतदारांचा मतदार यादीत समावेश करणे व त्यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढविणे हा प्रमुख उदेश आहे.

राष्ट्रीय मतदार दिवशी लोकशाहीवर निष्ठा टेवण्याची शपथ सर्व मतदारांना दिली जाते. त्यानूसार सर्व शासकीय कार्यालयामध्ये सर्व अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी शपथ घेण्याचा कार्यक्रम **दिनांक २५ जानेवारी २०२१** रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात यावा असे निर्देश दिलेले आहेत. राष्ट्रीय मतदार दिवसांची इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेमध्ये घ्यावयाच्या शपथेचा नमुना सदर पत्रासोबत जोडण्यात आला आहे. उपरोक्त प्रमाणे राष्ट्रीय मतदार दिवसाची शपथ घेतलेबाबतचा फोटोसह अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा. ही विनंती.

**(मृणालिनी सावंत)**
**उप जिल्हा निवडणूक अधिकारी,**
**पुणे**